आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

४ जानेवारी २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- ग्रामविकासातून राष्ट्रविकासाच्या दिशेनं केंद्र सरकार काम करत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- शहरी भागातही कुपोषण मुक्तीची मोहीम प्रभावीपणं राबवण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

- बीडमधले संतोष देशमुख हत्या प्रकरणी पाच आरोपींना अटक, १८ जानेवारीपर्यंत सीआयडी कोठडी

**आणि**

- अणु ऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष राजगोपाल चिदंबरम यांचं मुंबईत निधन

**<><><><><>**

ग्रामविकासातून राष्ट्रविकासाच्या दिशेनं केंद्र सरकार काम करत आहे. ग्रामीण भारताला सक्षम करायला केंद्र सरकारचं प्राधान्य असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत ग्रामीण भारत महोत्सवाचं उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

**होल्ड - प्रधानमंत्री बाईट (२९)**

यावेळी त्यांनी ग्रामीण भागासाठी सरकार राबवत असलेल्या इतर योजनांचा आढावा घेतला. यामुळे गेल्या १० वर्षात २५ कोटी लोक गरीबीतून बाहेर आल्याचं त्यांनी सांगितलं. २०१२ मध्ये ग्रामीण भागात २६ टक्क्यांवर असलेलं गरीबीचं प्रमाण २०२४ मध्ये ५ टक्क्यांवर आल्याचा स्टेट बँकेच्या संशोधन अहवालाचा संदर्भ त्यांनी दिला. ग्रामीण समाजाला स्वयंपूर्ण बनवण्यासाठी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी अंतर्गत शेतकऱ्यांना तीन लाख कोटी रुपयांची मदत करण्यात

आल्याचं ते म्हणाले. गेल्या १० वर्षात कृषी कर्जाच्या रकमेत साडे तीन पट वाढ झाली. आता पशुपालक आणि मत्स्यपालकांनाही किसान क्रेडिट कार्ड दिले जात आहे, असं प्रधानमंत्री म्हणाले. प्रधानमंत्र्यांनी या महोत्सवात सहभागी झालेल्या कारागिरांशी संवाद साधला.

**<><><><><>**

उत्पादक राज्य आणि ग्राहक राज्यांमध्ये अनेक वेळा कृषी मालाच्या किंमतीत तफावत असते. ही तफावत दूर करण्यासाठी वाहतूक आणि साठवणूकीच्या किंमतीचा भार सरकार उचलणार असल्याचं केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंग चौहान यांनी सांगितलं आहे. ते आज नवी दिल्लीत राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या कृषी मंत्र्यांच्या आढावा बैठकीत बोलत होते. यावर्षी कृषी आणि संबंधित क्षेत्रातला वाढीचा दर साडेतीन ते चार टक्क्यांदरम्यान राहणं अपेक्षित असल्याची माहिती त्यांनी दिली.

**<><><><><>**

राज्याच्या ग्रामीण भागासोबतच शहरी भागात विशेषत: मुंबईत झोपडपट्टी परिसरात कुपोषण मुक्तीची मोहीम प्रभावीपणं राबवण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस दिल्या आहेत. महिला आणि बालविकास विभागाच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

**<><><><><>**

राज्यातल्या प्रत्येक शहरात चित्रपटगृहांची संख्या वाढण्याची गरज आहे. त्यासाठी सध्या असलेल्या एकल पडदा चित्रपटगृहांना काही सवलती देता येतील का, तसंच मराठी नाटक आणि चित्रपट एकाच ठिकाणी दाखवता येतील का याबाबत विचार करावा, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केल्या. नगरविकास विभागाच्या आगामी शंभर दिवसांच्या कामकाज नियोजनाबाबत

झालेल्या बैठकीत ते बोलत होते. राज्यातल्या विविध नियोजन प्राधिकरणांचं सक्षमीकरण करुन त्यांचं कामकाज कंपनीच्या धर्तीवर करावं, असंही ते म्हणाले.

<><><><><>

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातल्या विविध प्रकल्पांचा आढावाही मुख्यमंत्र्यांनी आज घेतला. पुढच्या वर्षीपासून दरवर्षी किमान ५० किलो मीटर  मेट्रो कार्यान्वित होतील, असं  नियोजन करण्याचे तसंच  सर्व मेट्रोमार्गांची कामं  पूर्ण होण्याचं  वेळापत्रक नव्यानं  तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. इंदू मिल इथलं भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचं  स्मारक डिसेंबर २०२५ अखेरीस पूर्ण करा. इंदू मिलसह शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे स्मारकाच्या वार्षिक देखभालीसाठी आराखडा बनवण्याचे आदेश त्यांनी दिले.

<><><><><>

लाडकी बहीण  योजनेच्या कोणत्याही लाभार्थ्याची चौकशी अथवा पडताळणी करण्याचे कोणतेही निर्देश अद्याप शासनाकडून आलेले नाहीत . त्यामुळे धुळे जिल्ह्यात लाडकी बहिण योजनेच्या कोणत्याही लाभार्थ्यांची चौकशी करण्यात आलेली नाही अथवा त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली नाही, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी दिली.

**होल्ड - धुळे बाइट (१८ सेकंद)**

या योजनेबाबत कुणाचा अर्ज अथवा आक्षेप प्राप्त झाल्यास त्याबाबत शासन नियमानुसार चौकशी करुन निर्णय घेण्यात येईल, असंही जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितलं.

<><><><><>

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणांतील फरार आरोपी सुदर्शन घुले आणि सुधीर सांगळे याना पुण्यातून तर सिध्दार्थ सोनवणे याला मुंबईतून अटक करण्यात आली आहे. या तीन आरोपींसह त्यांना सहकार्य करणारे डॉ.संभाजी वायबसे आणि त्यांची वकील पत्नी या दोघांना पोलिसांनी नांदेड इथून अटक केली होती. या सर्व आरोपींना केज न्यायालयात आज हजर करण्यात आलं, न्यायालयानं या सर्वांना १८ जानेवारीपर्यंत सीआयडी कोठडी सुनावल्याचं, आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. कृष्णा आंधळे हा आरोपी अद्याप फरार आहे.

दरम्यान, या प्रकरणी आज परभणीत सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला. यावेळी मंत्री धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याची मागणी संतोष देशमुख यांच्या भावानं केली.

**<><><><><>**

भारताच्या विज्ञान क्षेत्रात मत्त्ववपूर्ण योगदान देणारे विख्यात भौतिक शास्त्रज्ञ डॉक्टर राजगोपाल चिदंबरम यांचं आज पहाटे मुंबईत वार्धक्यानं निधन झालं. ते ८८ वर्षांचे होते. केंद्र सरकारचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार, भाभा अणु संशोधन केंद्राचे संचालक, अणु ऊर्जा आयोगाचे अध्यक्ष आणि अणु ऊर्जा विभागाचे केंद्रीय सचिव अशा अनेक जबाबदाऱ्या त्यांनी आपल्या कारकीर्दीत सांभाळल्या. डॉ. चिदंबरम हे भारताच्या अण्वस्त्र कार्यक्रमाचे प्रमुख रचनाकार होते. पोखरणमधल्या दोन्ही अणू चाचण्यांमध्ये त्यांनी मोलाची भूमिका बजावली.

चिदंबरम यांना१९७५ मध्ये पद्मश्री आणि १९९९ मध्ये पद्मविभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं होतं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी डॉक्टर चिदंबरम यांच्या निधनाबद्दल शोकभावना व्यक्त केल्या आहेत.

**<><><><><>**

भारतीय जनता पार्टी  उद्या राज्यभर विशेष सदस्यता नोंदणी अभियान राबवणार असल्याचं आमदार रविंद्र चव्हाण यांनी सांगितलं आहे. ते आज भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या वार्ताहर परिषदेत बोलत होते. यानिमित्त एकाच दिवशी २५ लाखांहून अधिक सदस्य नोंदणी करण्याचे लक्ष्य आहे अशी माहिती त्यांनी दिली. या विशेष सदस्य नोंदणी अभियानाची सुरुवात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे नागपूरमधून करणार असल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान, वसई परिसरातल्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आणि बहुजन विकास आघाडीच्या सुमारे ३०० कार्यकर्त्यांनी आज आपल्या उपस्थितीत भाजपामध्ये प्रवेश केल्याचं चव्हाण यांनी सांगितलं.

**<><><><><>**

बाबा आमटे एकता अभियान ट्रस्टतर्फे दिला जाणारा ‘बाबा आमटे जीवनगौरव पुरस्कार २०२५’ ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि युक्रांदचे संस्थापक डॉ. कुमार सप्तर्षी यांना जाहीर झाल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. विकास आमटे यांनी दिली.

**<><><><><>**

धुळे जिल्ह्यातली वीज वितरण व्यवस्था सुरळीत करावी अन्यथा  संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असा इशारा पणन आणि राजशिष्टाचारमंत्री जयकुमार रावत यांनी दिला आहे. रावत यांनी आज धुळे जिल्हाधिकारी कार्यालयात सर्व विभाग प्रमुखांची बैठक घेऊन प्रशासन कार्याचा आढावा घेतला.

**<><><><><>**

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सुरू असलेल्या बॉर्डर गावस्कर चषक कसोटी क्रिकेट मालिकेतल्या, सिडनी इथं सुरू असलेल्या पाचव्या आणि अखेरच्या

सामन्यात, भारतानं दुसऱ्या दिवसअखेर आपल्या दुसऱ्या डावात ६ बाद १४१ धावा केल्या आहेत. आज सामन्याच्या दुसऱ्या दिवशी भारतानं, ऑस्ट्रेलियाचा पहिला डाव १८१ धावांत गुंडाळला आणि पहिल्या डावात ४ धावांची माफक आघाडी मिळवली. भारताच्या वतीनं मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी ३ तर जसप्रीत बुमराह आणि नितेश रेड्डी यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले. ऑस्ट्रेलियाच्या वतीनं पदार्पणवीर वेबस्टर यानं सर्वाधिक ५७ धावा केल्या.

त्यानंतर दुसऱ्या डावात फलंदाजीसाठी उतरलेल्या भारताचा डाव पुन्हा एकदा गडगडला. मात्र ऋषभ पंत यानं ३३ चेंडूत ६६ धावा करत भारताच्या धावसंख्येत मोठी भर घातली. आजच्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा रविंद्र जडेजा ८ धावांवर तर वॉशिंग्टन सुंदर ६ धावा करून खेळपट्टीवर टिकून होते.

दरम्यान या सामन्यासाठी कर्णधारपदाची जबाबदारी सांभाळत असलेला जसप्रित बुमराह याला सामना सोडून वैद्यकीय तपासणीसाठी जावं लागल्यानं, त्याच्या तंदुरुस्तीबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे, गेल्या २४ तासात विदर्भात काही ठिकाणी तर कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किमान तापमानात सरासरीच्या तुलनेत किंचित घट झाली आहे.

**//<><><><><>//**